## महामेट्रो मार्फत नळ स्टॉप, कर्वे रोड या मेट्रो मार्गिकेतील वाहतूक सुरळीत चालण्यासाठी केलेल्या उपाययोजना

पुणे, ३१ जुलै २०१९: वनाज ते सिव्हिल कोर्ट मेट्रो मार्गावर काँग्रेस भवन आणि महानगरपालिका येथील ड्रेनेज लाईन ची महामेट्रो आणि पीएमसी अधिका-यांच्या मार्फत संयुक्तपणे पाहणी दिनांक 30.07.2019 रोजी करण्यात आली आहे. महा मट्रो तर्फे पावसाळी खड्डे बुजवणे, चेम्बरची दुरुस्ती करणे व रस्त्याचे देखभाल दुरूस्ती करण्याकरीता आवश्यक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. महामेट्रो आणि पीएमसी अधिकारी हे एकत्रित समन्वय साधून रस्त्यावरील पावसाळी खड्डे बुजविण्याकरीता प्रयत्नशील आहेत. तसेच पाण्याचा निचरा करणे, ट्रॅफिक नियोजन करणे, ज्या ज्या ठिकाणी ड्रेनेज ब्लॉक आहेत तेथील ब्लॉकेज काढणे आणि पाण्याचा निचरा करणे इत्यादी कामे समन्वयाने करीत आहे. तसेच काल रात्री महानगरपालिकेतर्फे नळ स्टॉप चौकात नवीन पावसाळी लाईन टाकण्याचे काम सुरु आहे. त्यामुळे नळ स्टॉप चौकात साचलेल्या पावसाळी पाण्याचा निचरा व वाहतूक सुरळीत होण्यास मदत होईल. डेंगळे पुलाजवळील पावसाळी लाईनची दुरूस्ती महामेट्रोमार्फत नुकतीच करण्यात आली आहे.





अतिवृष्टी आणि धरणातुन पाणी सोडले गेल्यामुळे दिनांक 30.07.2019 पासून नदीपात्रातील रस्ता आणि भिडे पुल बंद करण्यात आला आहे. त्यामुळे तेथील दुचाकी आणि चारचाकी वाहने ही नळ स्टॉप आणि कर्वे रोड या मार्गाने वाहतूक करीत आहेत. त्यामुळे नळ स्टॉप आणि कर्वे रोड येथिल वाहतूकीची संख्या वाढली आहे. वाहतूक सुरळीत राहण्यासाठी आणि वाहतूक नियोजनासाठी महामेट्रोकडून कर्वे रोड व पौड रोड येथे विविध चौकात प्रशिक्षित ७० ट्रॅफिक मार्शलची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच महामेट्रो तर्फे ७५ ट्रॅफिक वार्डन,ट्रॅफिक पोलीस विभाग कोथरूड, डेक्कन आणि शिवाजीनगर येथे वर्ग करण्यात आले आहे. याव्यतिरिक्त महामेट्रोचे जलद कृती दल वाहतूक नियंत्रण करीत असतात.



वनाज ते सिव्हिल कोर्ट या मेट्रोमार्गावर मुख्यत: कर्वेरोड आणि पौड रोडवर जुलै महिन्यात महामेट्रोने एकूण २३४ पावसाळी खड्डे बुजविले आहेत तसेच एकूण २६ चेंबरची दुरुस्ती केली आहे. महामेट्रोकडून सातत्याने पावसाळी खड्डे बुजवणे , चेंबर स्वच्छ करणे व दुरुस्ती करणे ही कामे सुरुच आहेत. महामेट्रो मार्गावर नागरिकांना वाहतूकीसाठी कमीत कमी त्रास सहन करावा लागेल यासाठी महामेट्रो प्रयत्नशील आहे . त्यासाठी महामेट्रो वाहतूकनियोजनासाठी सर्वोतोपरी प्रयत्नशील आहे.